# मुकुल माधव फाउंडेशनच्या दुसऱ्या सायक्लोथॉनचे आयोजन

**पुणे** : मुकुल माधव फाऊंडेशनचे (एमएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने व बायसिकल एंजेल्स या ना - नफा तत्त्वावरील सामाजिक उपक्रमासह पुणे ते रत्नागिरी या सायक्लॉथॉनचे आयोजन केले असून समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. ८ डिसेंबर रोजी सुरु होऊन ते १२ डिसेंबर २०१५ पर्यंत ते चालेल. दोन व्यावसायिक सायकलपटू या अनोख्या कार्यक्रमात उपस्थित असतील.



हा कार्यक्रम मुकुल माधव फाऊंडेशनचा एक उपक्रम असून फिनोलेक्स पाईपने आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत तो प्रायोजित केला आहे आणि अशोक लेलँड हे याचे ट्रॅव्हल पार्टनर असणार आहेत.